म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 380

REFBK-0003281

ग्रं. सं. टाकें

लघुग्रंथमाला पुष्प ६ वे.

# दगलबाज शिवाजी

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र शिवराय भूपति ॥




तत्र श्रीविजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

SHIVAJI -- THE DIPLOMAT.

लेखक—केशव सीताराम ठाकरे
संपादक प्रबोधन.

किंमत १ आणा.

# प्रस्तावना.



REFBK-0003281



चालू ५ व्या वर्षाच्या प्रबोधन मासिकाच्या ८ व्या अंकांत प्रसिद्ध झालेला हा अग्रलेख, दोन तीन ठिकाणीं विषयस्पष्टीकरणार्थ थोडा जास्त मजकूर घालून, आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला आहे. शिवाजीसारख्या राष्ट्रवीराच्या चारित्र्यांतील बऱ्या वाईट गोष्टींचा निर्णय ठरवितांना कोणता दृष्टीकोण ठेवणें अगत्याचें आहे, हें दाखविण्याचाच माझा मुख्य हेतु आहे; आणि हें काम मी इतिहास—शास्त्राला धरून यथामति बजावीत आहे. तें जनतारूप जनार्दनास मान्य होवो.

पुणें शहर,
२ जुलै १९२७.

**केशव सीताराम ठाकरे.**

---

प्रबोधन लघुग्रंथमालेचें पुढचें ७ वें पुष्प


**कायदेबाजी आणि कज्जेदलाली**

लवकरच प्रसिद्ध होईल.

**जाहीराती देणारांनीं त्वरा करावी.**

# हिन्दु जनांचा ऱ्हास आणि अधःपात.

बॅरिस्टर मूकर्जी
आणि
प्रबोधनकार ठाकरे
कृत



# दगलबाज शिवाजी.

## लेखक :—केशव सीताराम ठाकरे.


"'There is always a sacred veil to be drawn over the beginings of all governments."

—Edmund Burke.

महाराष्ट्रापुरताचँ विचार केला, तर आज हिन्दूंची तेहतीस कोटी देवांची फलटण पेनशनींत निघून, त्या सर्वांच्या ऐवजीं एकटा शिवाजी छत्रपति परमेश्वर म्हणून अखिल मऱ्हाठ्यांच्या हृदयासनावर विराजमान होऊन बसला आहे. शिवाजी म्हणजे मऱ्हाठ्यांचा कुळस्वामी आणि महाराष्ट्राचा राष्ट्रदेव. 'गॉड सेव्ह ध किंग', या राष्ट्रगीताचे सूर बँडमधून निघतांच इंग्रेज लोकांत जें एक वर्णनीय चैतन्याचें वारें चढून थरारतें, तेंच चैतन्य एका शिवाजी या नामोच्चारांत अवघा महाराष्ट्र अनुभवतो. वन्दे मातरम् या राष्ट्रगीताला सुद्धां अझून मऱ्हाठ्यांचीं अंतःकरणें काबीज करतां येत नाहींत; याचें कारण शिवाजी शिवाय इतर कसल्याहि भावनेला तेथें जागाच उरलेली नाहीं. एवढें ज्या शिवरायाचें महात्म्य, त्याला 'दगलबाज' हें विशेषण लावण्याचें धाडस प्रबोधनकारा सारख्या जातीवंत मऱ्हाठ्यानें करावें, ही वस्त्रगाळ निमकहरामी होय! अशा शंकेचें काहूर वाचकांच्या वृत्तींत उठल्याशिवाय खास राहणार नाहीं. शिवराया सारख्या राष्ट्रवीराची कुचेष्टा करून, आपली प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रबोधनकाराचा हा बाष्कळ प्रयत्न तर नसेल? असाहि कित्येक तर्क बांधतील. सर्व शंकितांना आम्ही आगाऊच ग्वाही देऊन ठेवतों कीं प्रबोधनकाराच्या

# फक्त रु. ९-१५ आण्यांत

# फॅमिली फोल्डींग ग्रामोफोन




रजिस्टर्ड ट्रेडमार्क

ह्या ग्रामोफोनमध्यें एक खुबी आहे कीं त्याचे सर्व भाग साऊंड बॉक्स, भुंगा, रेकार्ड वगैरे सर्व एका पेटींत राहूं शकतात व चालविण्यास इतका सुलभ आहे कीं एखादें लहान मूलहि चालवूं शकतें. इतकें असून किंमत डबल साईड रेकार्डसह. रु ९-१५-० १०० पीनची डबी फुकट. व्ही.पी. १ रु. ४ आ. निराळे रेकार्ड डझन रु. १५. २०० पीन डबीचे ८ आणे.

**धी नॅशनल स्टोअर्स** (नं. ६०) भिमश्रॉफ चाळ, **मुंबई नं. २**

---

**दुष्मन, दगलबाज, चोर, आणि हिंस्र जनावरां पासून आत्मरक्षण करण्याचे उत्तम साधन.**




## 'एअर पिस्तुल'

लायसन्स [परवानगीची] कांहीं जरूरी नाहीं. इतके फायदे असून किंमत अवघी ४ रुपये ४० गोळ्यासह व्ही. पी. चार्ज ६ आणे निराळा. आणखी ४० गोळ्या पाहिजे असल्यास एक रुपया जास्त पडेल.

**धी नॉव्हेल्टी स्टोअर्स ( ५० ) मुंबई नं० २.**

खाणीच्या इतिहासांत निमकहरामी आणि आत्मप्रतिष्ठा आजपर्यंत कोणालाहि आढळलेली नाहीं. लेखन–संस्काराच्या गंधाक्षता प्रथम वाहून शिवचरित्राला चिरंजीव करण्याची आद्य कामगिरी याच खाणींतल्या बखरकारांनीं बजावलेली आहे. कालौघानें शिवरायाच्या शिव चारित्र्यावर लौकिकी कल्पनांनीं जर भलभलत्या रंगांचा मारा करून, त्याचें खरें उज्वल रूप विकृत केलें असेल, अगर तें तसें झालें असेल, तर त्याचा सप्रमाण मुद्देसूद निरास करून, लोकमताच्या वाजवी प्रबोधनासाठीं प्रबोधनकारानें आपलें शिवप्रासादिक कलमास्त्र परजणें, त्याचें कर्तव्यच आहे. हें कटु कर्तव्य आहे. कल्पनेनें किंवा अंधश्रद्धेनें काढलेलें शिवरायाचें चित्र बाजूला सारून, त्या राष्ट्रवीराची खरीखुरी प्रतिमा धिटाईनें लोकांपुढें मांडणें, म्हणजे लोकक्षोभाला बळेंच आव्हान देण्याइतकेंच भयंकर काम आहे. पण तें कोणी तरी केव्हां तरी करणेंच प्राप्त असल्यामुळें, लोकक्षोभाची पर्वा न बाळगतां, हौसेनें तें आम्ही आपल्या शिरावर घेतलें आहे.

## शिवरायास आठवावें.

कां आठवावें ? आम्हाला तो नित्य आठवतोच कां ? विसरूं म्हटलें तरी तो कां विसरला जात नाहीं ? शिवरायानें केलें तरी काय, कीं त्याचें महाराष्ट्रानें आमरण स्मरणच करावें ? माणसांची माणुसकी त्यांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यानें सिद्ध होत असते. ज्या राष्ट्राला स्वातंत्र्य नाहीं, परकीयांच्या राजसत्तेखालीं जें जगत असतें, त्या राष्ट्रांतल्या माणसांना 'ह्यूमन कॅटल' माणशी गुरेंढोर हीच संज्ञा यथायोग्य शोभते. शिवाजीच्या हृदयांत राष्ट्रधर्माच्या या तीव्र भेदाची विद्युल्लता चमकेपर्यंत, सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत, महाराष्ट्रांतला

# STOP

## WASTING YOUR PRECIOUS MONEY

**On Wretched Wooden Boards.**

NEW ERA USHERS

**ALLUMINUM METAL BOARDS**

To Your Notice.

They are perpetual, durable, solid, strong, non-corrogible, theft-proof, fool-proof.

**ONCE BOT SAVES A LOT**

of money, unnecessarily exacted by the old-type wooden boards, requiring re-painting almost every year.

**Motor Number Plates**

and Loose Big Types [ 2" to 1' ] for big Shop-Boards ready to order.

☞ Alluminum Board Factory,
406 Shanwar, Poona City.

## हिंदु म्हणजे ह्यूमन कॅटल

बनलेला होता. तोंड असून मुका, कान असून बहिरा, डोळे असून आंधळा आणि माणूस असून परकीय मुसलमानी सत्तेच्या पखाली वाहणारा बैल होऊन राहिला होता. गुलामगिरीचा पेंड कडबा खाऊन खाऊन हा बैलसुद्धां इतका मस्तवाल बनला होता, कीं इस्लामी मानपानाच्या नक्षीदार झुली घुंगुरमाळांनीं नटलेल्या त्याच्या अनेक पुढारी नंदीबैलांनीं शिवाजीच्या राष्ट्रीय प्रबोधन-कार्यांत शेकडों वेळां शिंगे खुपसण्यास कमी केलें नाहीं. महाराष्ट्राला माणुसकी देण्याच्या महत्कार्यांत विरोधाचे जितके जितके बाण शिवाजी-गरुडाच्या काळजांत घुसले, तितक्या तितक्या


## बाणांचा पिसारा स्वकीयांच्याच पंखाचा

होता. दारच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षां घरच्या विरोधकांशीं झगडण्यांतच शिवाजीच्या अर्ध्याअधिक हिंमतीचा होम करावा लागला. अशा अवस्थेंतहि शक्तियुक्तीची पराकाष्ठा करून, शिवाजीनें महाराष्ट्राला स्वतंत्र हिंदवी स्वराज्याचा सोहळा दाखवून, मऱ्हाठ्यांना पशू-वृत्तींतून माणसांत आणून बसविलें. जी गोष्ट एका काळीं अखिल महाराष्ट्राला अशक्य वाटत होती, आजहि जी पुन्हा अशक्य अशक्य अशक्य म्हणून परिस्थिति आम्हाला दटावून बजावीत आहे, तीच नेमकी गोष्ट शिवाजीनें शक्य करून दाखविली. या एकाच कारणासाठीं महाराष्ट्रानें शिवरायाला अखंड आठवलें पाहिजे आणि तसा तो आठवीतहि आहे. परंतु, शिवरायाच्या चारित्राकडे महाराष्ट्र आज ज्या दृष्टीनें पहात आहे ती आमच्या हाडींमासीं भिनलेल्या अवतार-कल्पनेनें आरपार बुरसटून गेलेली असल्यामुळें, शिवरायांच्या विकृत चरित्र-चित्राच्या भजनीं

# फक्त रु. ९-१५ आण्यांत.

## दहा वर्षे गॅरंटी.

### मनपसंत रेडियम रिस्टवॉच आणि वर
### २० मौल्यवान् वस्तू बक्षीस !

REGD.  रजिस्टर्ड

हा घड्याळांत रेडियम इतकें उत्तम आहे कीं, त्याचा चकचकाट दिवसासुद्धां दिसतो. घड्याळाशिवाय खास ग्राहकांचे लाभासाठीं हा एका घड्याळासोबत खालीं दिलेल्या २० किंमती व नित्योपयोगी जिनसा इनाम देण्यांत येतात. ( १ ) पॉकेट लॅम्प ( २ ) फाऊटन पेन ( ३ ) शाईची बाटली ( ४ ) ॲटोमॅटिक पेन्सिल. ( ५ ) ॲटोमॅटिक पेन्सिलकटर ( ६ ) इमिटेशन हिऱ्याची आंगठी ( ८ ) रोल्डगोल्डची सेफ्टि पिन ( ९ ) चाकू ( १० ) चष्मा ( ११ ) हातांतील घड्याळाची स्टॅप ( १२ ) क्यामेरा चार्म ( रोल्ड गोल्ड लॉकेट ) ( १३ ) सीगर लॅम्प ( १४ ) खमीसाची बटनें ( १५ ) कोटाचीं बटनें ( १६ ) रुमाल ( १७ ) सेंटची बाटली ( १८ ) एक प्याला ( १९ ) गंजीफा पत्ता ( २० ) कातर. सोनेरी अथवा निकलचें जसें पाहिजे असेल तसें फक्त रु. ९-१५ आण्यांत मिळेल. व्ही. पी. पोस्टेज एक रु. निराळा पडेल. गॅरंटी १० वर्षे.

मिळण्याचें ठिकाण—

**दीलावर ॲन्ड को. नं. ४८ राममंदीर, भुलेश्वर, मुंबई नं. २.**


आमची टाळकुटी भावना फुकट खर्चीं पडत आहे. इतकेंच नव्हे, तर त्या मुळें शिवाजीच्या राष्ट्रोद्धारक विराट व्यूहाबद्दल आम्हाला फारसा गंभीरपणाहि वाटेनासा झाला आहे. शिवाजीचा स्वराज्योद्-क्रम म्हणजे ईश्वरी संकेतानें आणि 'समर्थांच्या' कृपेमुळें सहज-गत्या घडून आलेला एक नवलाईचा चमत्कार, इतक्या हलक्याफूल भावनेनें आम्ही त्या प्रचंड प्रबोधनाकडे पहात आहों. पुराणांच्या पारायणानें पंगु बनलेल्या आमच्या मनोवृत्तीला, शिवचरित्राची कमावणि कसकसल्या भयंकर दिव्यांतून होत गेली, याची जाणी-वहि होईनाशी झालेली आहे. शिवचरित्रांतील मोठमोठे प्रसंग म्हणजे बाल-कृष्णाच्या पूतनाकर्पणा प्रमाणें 'ईश्वरी लीला' वाट-तात. कोणत्याहि पुरुषोत्तमाच्या चारित्र्यावर एकदा का

## अवतार कल्पनेचा सफेदा

चढला आणि त्याची सर्व लहानमोठी बरीवाईट कृत्यें 'ईश्वरी लीला' सदरांत पडली कीं त्या चरित्रापासून आत्मोद्धारार्थ लाग-णारें स्पिरिट मनुष्याला केव्हांहि प्राप्त होत नसते. राम कृष्णांचीं उज्वल चरित्रें आज आमच्या व्यवहारांत कवडीमोल होऊन बसली आहेत, याचें तरी कारण हेंच. रामविजय हरिविजय पांडवप्रताप हे ग्रंथ म्हणे चातुर्मासांत सोवळ्यानें वाचायचे आणि श्रोत्यांनीं झोपांच्या डुलक्यांत ऐकायचे. कां? तर म्हणे तेवढेंच पुण्य गाठीं! मराठी महाभारत कपाटाच्या शोभेला. टिळकांचें गीतारहस्य देव-घरांत फक्त पूजेला. कां? तर टिळक म्हणे शेषशायी चतुर्भुज भग-वान! टिळकांना भगवान बनविल्यावर, शिवाजी परमेश्वराचा परमेश्वर तरी ठरविलाच पाहिजे. त्याशिवाय आम्हा नादान हिंदूंच्या भाविकपणाचा भाव कसा वाढणार? जिकडे पहाल तिकडे

# कायमची दलामल चुकली.

आतां लाकडी पाट्या रंगवून घेण्याची जरूरच नाहीं. कारण अगदी थोड्या खर्चांत, चिरकाल टिकणाऱ्या कायम झिलईच्या खास तुमच्याच नांवाच्या ओतून घेतलेल्या, असल्या




## ॲल्युमिनम धातूच्या पाट्या

तयार होऊं लागल्या. चोरीची धास्ती नाहीं. वरचेवर रंगविण्याची खटखट नाहीं. फुटण्या तुटण्याची भीति नाहीं. एकदां घेतली कीं चिरंजीव! मोटार नंबर प्लेटी, दुकानांच्या मोठ्या बोर्डासाठीं (१ फूट ते २ इंचापर्यंत) मोठमोठीं सुटी अक्षरें तयार मिळतील. किंमतीच्या किंवा इतर खुलाशासाठीं १ आण्याचें टिकीट पाठवा.

**ॲल्युमिनम बोर्ड फॅक्टरी**

४०६ शनिवार, पुणें शहर.

## पौराणिकी दृष्टीचा अडथळा.

शिवाजीचा काळ होऊन आज अडीचशें वर्षे झाली, तरी देखिल त्याच्या चारित्र्याला जगाची एकमुखी मान्यता अझून मिळालेली नाहीं. महाराष्ट्राला तो परमेश्वरावतार वाटत असला, तरी एकट्या हिंदूशिवाय इतर सर्व जगाला तो दगलबाज, डोंगरांतला उंदीर, उपटशुंभ असाच वाटतो. पुण्यांत कै. शाहू महाराज करवीरकरांनीं शिवाजी मेमोरियलचा धाडशी प्रयोग केल्या दिवसापासून राज्यकर्त्या इंग्रेजी नोकरशाहीची शिवाजी विषयीं भाषा किंचित नरमलेली आहे. निदान ओठांवर तरी वरीच साखर चमकते, मग पोटांत काय असेल तें पोट जाणें ! परंतु शिवछत्रपतींची जगमान्यता अझून जवळजवळ साशंकावस्थेंतच आहे, असें कबूल केल्याशिवाय सुटका नाहीं. याचें कारण काय ? राष्ट्रवीरांची कीर्ती जगविश्रुत करण्याची कामगिरी वास्तवीक इतिहासकारांनीं करावयाची असते. परंतु आमचे मऱ्हाठी इतिहासकार अथपासून इतिपर्यंत एकजात पुराणिक. पौराणिकी साच्याशिवाय त्यांची विद्वत्ता कशांतहि ठाकठीक बसायची नाहीं. प्रथम शिवाजीला ते परमेश्वराचा अवतार बनवतील, कौसल्येप्रमाणें जिजाबाईला दिल्लीपति मोंगलाच्या वधाचे डोहाळे पाडतील, तेव्हां कोठें त्यांना 'शिवसंभव' दिसायचा. थोडासा सत्याचा धागा, त्यावर यांच्या कल्पनेच्या कोलांट्या उड्या ! ना त्यांत विवेक, ना चिकित्सा, ना साक्षेप. येथून तेथून भावनावशतेचा खरकटवाडा. शक्याशक्यतेचा विचार नाहीं, परिस्थिति-परीक्षणाची दृष्टी नाहीं, फार काय पण, मानवी स्वभाव ओळखण्याचीहि अक्कल नाहीं. काय म्हणे,

" शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच
त्यानें आडदांड लोकांनी संगत धरून

# लायसन्स शिवाय

# रिव्हॉल्वर !

इन्फ्ल्युएंझा टायफॉईड निमोनिया प्लेग इत्यादि अनेक शत्रू मलेरियाचा मुखवटा घालून आपल्यावर केव्हां हल्ला चढवितील, याचा नेम नाहीं. लक्षावधि लोक यांनीं बळी घेतले व सध्यां घेत आहेत. अशा अवस्थेंत सिद्ध नागार्जुन प्रणित

# सुवर्णधारा

या जालीम मात्रेचें रिव्हॉल्वर नेहमीं संग्रहीं ठेवा. याचा नेम चुकत नाहीं. कोणत्याहि प्रकारचा ज्वर ( ताप ), बेशुद्धी, बडबड, अपस्मार, बाळंतपणांतील नंदवायू इत्यादि शेकडों हल्ल्यांवर सुवर्णधारा ५ मिनिटांत आपला प्रभाव सिद्ध करते. बाळंतपणांत ही मात्रा १० दिवस सतत दिल्यास दुसरें कोणतेंहि ओषध देण्याची जरूरी नाहीं. किंमत एक तोळ्यास फक्त चार रुपये.

## १ तोळा ५०० रोग्यांना जीवदान देतो.

वैद्य डॉक्टर व सुशिक्षित लोक ही मात्रा स्वतः घरांत वापरून शेकडों लोकांवर उपकार करीत आहेत. सुवर्णधारा म्हणजे खेड्यापाड्यांतला हजर जबाबी व हुकमी धन्वंतरीच होय. मागवा, स्वतः सुखी राहून इतरांना सुखी करा.

मॅनेजर, आयुर्वेदीक केमिकल फार्मसी,

मु. मो. किन्ई, व्हाया सातारा रोड

देशांत पुंडाई आरंभिली."

ही आमच्या शिवरायाच्या चरित्राची सुरुवात आणि ती क्रमिक इतिहासपुस्तकांतून आमच्या मुलांना पढवायची. आडदांड लोकांची संगत धरून देशांत पुंडाई आरंभणाऱ्याला जर स्वराज्य स्थापन करतां येतें, तर आज गांवोगांवचे गुंड राष्ट्रवीर कां बनत नाहींत? या सर्व दोषामुळें आमच्या जुन्या बखरी आणि सध्यांचे इतिहास-ग्रंथ शिवाजीच्या जगमान्यतेच्या कामीं नालायक ठरलेले आहेत. आमच्या लाडक्या हीरोबद्दल कोणी वाईट बोलला तर त्याच्या विधानाला समर्पक प्रत्युत्तर देण्याऐवजीं आम्ही नुसत्या शिव्याशापांवरच आमच्या इतिहास-विषयक प्राविण्याचें प्रदर्शन करतो. नाहींतर आमचा हीरो ईश्वरावतारच असल्यामुळें त्याच्या सर्व बऱ्या वाईट कृत्यांना पुराणांच्या पोतड्यांतील राम कृष्णांच्या तत्सम कृत्यांचा पाठपुरावा दाखवून, 'यां देवाच्या लीला, माणसांना कसच्या कळणार!' म्हणून शेरा ठोकून स्वस्थ बसतो. शिवाजीला कोणी दगलबाज म्हटलें कीं आमच्या नाकाचा शेंडा फुरफुरूं लागतो. पण शिवाजी दगलबाज कसा नव्हे? कां असूं नये? याचा मात्र विवेकशुद्ध विचार आम्हाला कधीं सुचायचा नाहीं. रूढ पौराणिकी मताची पर्वा न करता हा विचार खुलासेवार आज चर्चेला घेतला आहे.

## शिवाजीवर अहिन्दूंचे आरोप

तरी काय आहेत? याची यादी प्रथम घेऊं या. शिवाजीवर पहिला आणि ठळक आरोप म्हणजे राजद्रोहाचा. त्यानें विजापूरच्या अदीलशाही विरुद्ध म्हणे बण्ड उभारलें. कोणत्या तरी प्रस्थापित राजसत्तेला मूठमाती देऊन तेथें नवीन सत्ता स्थापणाऱ्या कोणत्याहि चक्रवर्तीचा आणि सम्राटाची या आरोपांतून सुटका होणें शक्य




तांव्या पितळेचीं व जर्मनसिल्व्हर चांदीचीं निरनिराळ्या सुबक घाटाचीं टिकाऊ भांडीं तयार मिळतील. दर माफक. व्यापाऱ्यांना विशेष सवलत. क्याटलाग मागवा.

## बी. ए. तारकर.

हेड ऑफीसः— ५२० कासार चाळ मुंबई नं. २

शाखा नं. १ :— लालबाग परेल मुंबई नं. १२

शाखा नं. २ :— गिरगांव पोर्तुगीज ट्रॅम नाका मुंबई ४

नाहीं. इंग्रेजांनीं तरी मऱ्हाठी साम्राज्य घशांत घालतांना काय अशा मोठया हुतुतूच्या लढाया दिल्या, तर युद्धांतील विजयाच्या निर्णयावर त्यांची या आरोपांतून सुटका होते? त्यांनीं तर मराठयांच्या घरांत शेकडों कटांची पोखरण घालून, आज याला फोड, उद्यां त्याला बनव, परवां तिसऱ्यालाच चवथ्याच्या उरावर घाल, अशाच घालमेली केल्या ना? मग इंग्रेजांनीं मऱ्हाठयांचा राजद्रोह केला, अशी भाषा कां पुढें येत नाहीं? तर आज हिंदुस्थानांत इंग्रेजी राज्य जबरदस्त आहे. नवीन राज्यें कमविणारांवर राजद्रोहाचा आरोप करणाऱ्या मतिमंद मूर्खांनीं इतकें तरी लक्षांत ठेवावें कीं नवीन देऊळ बांधतांना जुन्या देवळाला आमूलाग्र उलथून पाडावेंच लागते. ब्रिटीश रक्ताच्या ब्रिटीशांनींच अमेरिकेंतून ब्रिटीश सत्तेची उचलबांगडी करून नवीन संयुक्त अमेरिकन संस्थानांची स्थापना केली. मग जॉर्ज वॉशिंगटन हा सुद्धां मोठा दगलबाज राजद्रोही मानला पाहिजे. नंबर २:– शिवाजीनें अफजुलखानाचा 'खून' केला. जणूं काय अफजुलखान म्हणजे एकादा बावला किंवा श्रद्धानंदच! नंबर ३:– शिवाजी आग्र्याच्या बादशाही कैदेंतून पळाला, म्हणून तो दगलबाज. असले हे आरोप केवळ बुद्धिभ्रष्टता अगर जातिवंत दुष्टावा यांतूनच निर्माण होत असतात. राजद्रोह दगलबाजी विश्वासघात इत्यादि आरोप करणारे शहाणे स्वतःची भूमिका तर विसरतातच, पण हे आरोप कोणी कोणावर कोठें केव्हां आणि कां करावे, याचा विवेकहि त्यांच्या गावीं नसतो. मुसलमानांनीं शिवाजी विरुद्ध हात बोटें चोळली तर त्यांत कांहींतरी वाजवीपणा आहे. कारण, शिवाजीनें दक्षिणेंतल्या मुसलमानी सत्तेच्या चांदताऱ्यालाच आचंद्रार्क अर्धचंद्र दिला! पण

अपूर्व लाभ ! गीताभक्तांस अपूर्व लाभ !

भक्तियुक्त ज्ञान व ज्ञानयुक्त भक्तीचा अपूर्व मेवा सेवन करण्याची इच्छा असेल त्यांनीं घेण्यास अत्यंत योग्य.

श्रीरमावल्लभदासकृत ओवीबद्ध

# भगवद्गीता-चमत्कारी-टीका.

गीतेवरील अनेक संस्कृत प्राकृत टीका वाचून ज्यांचें मस्तक भणाणून गेलें असेल, ज्यांना गीताग्रंथाचा व गीतातत्त्वाचा आस्थापूर्वक 'अभ्यास' करणें असेल, त्यांनीं या पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. मूळ ग्रंथाचें परिशोधन ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत यांनीं केलें असून कठीण शब्दांवर विस्तृत टिपा दिल्या आहेत. प्रस्तावने दाखल 'गीतादर्श' नामक उत्कृष्ट निबंध म० आनंदघनराम तासगांव यांनीं लिहिलेला यास जोडला आहे. तसेंच, सर्व अध्यायांची सुविस्तृत अनुक्रमणिका गु. भ. प. रामचंद्र कृष्ण जोशी, एम्. ए. यांनीं अत्यंत परिश्रमानें तयार करून दिलेली जोडली आहे. पुस्तकाचे अखेरीस श्लोकांची आद्य चरणानुक्रमणिका व कलकत्याच्या एका पुस्तकावरून तयार केलेली गीतेंतील प्रधान शब्दांची सूचि जोडली आहे. ही सूचि म्हणजे गीतेंत एकच शब्द कोणकोणत्या अध्यायांत किती किती ठिकाणीं आहे याची जंत्रीच होय. ही महाराष्ट्रांत आजपर्यंत छापलेल्या गीतेच्या कोणत्याहि पुस्तकांत मिळणार नाहीं. सारांश, 'गीता ही श्रीकृष्णाची केवळ उक्ति नसून त्याची अद्भुत शक्ति आहे' व ती अंगांत भिनवून घेण्याची युक्ति ज्यांना शिकावयाची आहे, त्यांनीं या सर्वांगसुंदर गीताग्रंथाचा अवश्य संग्रह करावा. किंमत पुस्तकाच्या मानानें मुद्दाम स्वस्त म्हणजे २। रुपये ठेविली आहे. (ट. ख. निराळा)

**(१) सुभाव गोपाळ उभयकर, नारायणपूर, हुबळी.**
**(२) लोकमान्य एजन्सी, रविवार पेठ, बेळगांव.**

## इंग्रेज म्हणजे न्यायाचा सागर

आणि हिस्टॉरिकल परस्पेकटिवचा आगर ! त्यांनीं शिवाजीवर खुनाची आणि दगलबाजीची एवढी आग कां पाखडावी ? असा एकसुद्धां इंग्रेज इतिहासकार आढळत नाहीं कीं ज्यानें अफझुल-खानाच्या वधाचा पराचा पारवा करून शिवाजीवर शिव्यांची लाखोली वाहिलेली नाहीं. प्रतापगडच्या मुकाबल्यांत अफझुल-खानानें आपल्या प्रतिज्ञेच्या संकेताप्रमाणें शिवाजीचाच कोथळा काढला असता, तर त्याविषयीं निस्पृहपणाची मिजास मारणाऱ्या इंग्रेज इतिहासकारांनीं काय उद्गार काढले असते, याची कल्पना सुद्धां बरीच मनोरंजक होईल. इंग्रेज हा असा एक विलक्षण प्राणी आहे कीं त्याला इतरांच्या डोळ्यांतील कुसळ चटकन् दिसते, पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ मात्र मुळींच दिसत नाहीं. न्यायबुद्धीची यांची घमेंड जगप्रसिद्धच आहे; परंतु त्यांत एक मख्खी आहे. आपमतलबासाठीं इंग्रेजी न्याय कधिं पृथ्वीइतका फुगेल, तर कधीं सुईच्या डोळ्यांतून सफाईत निसटून टाचणीच्या टोकावर तांडवनृत्य करील. शिवाजी एक वेळ राहूं द्या; बोलून चालून तो हिंदू. पण नेपोलियन बोनापार्ट तर युरपियनच ना ? त्याच्या चारित्र्याचें सार काढतांना विद्यमान सुप्रसिद्ध इतिहासकार एच. जी. वेल्स आपल्या 'औटलाईन्स ऑफ धी हिस्टरी ऑफ धी वर्ल्ड' नामक महाग्रंथांत काय अक्कल पाघळतात ती पहाः —

It would be difficult to find a human being less likely to arouse affection. One reads in vain through the monstrous accumulations of Napoleonic literature for a single record of self-forgetfulness. Laughter is one great difference between man and lower animals, one method of our brotherhood, and there is no evidence




# गोदरेज

## म्हणजे

# हिन्दी देशी

भांडवल
कामगार
धाडस
बुद्धिमत्ता

**ही कीर्ती आतां लोकविश्रुत झालेली आहे.**

**गोदरेज सावण**

आंगाला लावण्याचे टॉयलेट.
कपडे धुण्याचे पेल बार सोप.
टेक्स्टाइल आणि लॉन्ड्री सोप.
विलायती सावणापेक्षां टिकाऊ व सरस.

रासायनिक दृष्ट्या शुद्ध. यांत जनावरांची चरबी किंवा कसलेहि घाणेरडें द्रव्य मुळींच वापरण्यांत येत नाहीं.

## गोदरेज डबल बॉइल्ड लिनसीड ऑइल

सिंह छाप, शहामृग छाप, XXX. छाप.

कमाल शुद्ध. ताडपत्री व इतर रंगरंगोटीच्या कामांत मनपसंत, टिकाऊ आणि स्वच्छ.

## गोदरेज तिळाचें तेल

निवडक तिळापासून आधुनिक यंत्रानें काढलेलें कमाल स्वच्छ.

**गोदरेज ऑइल ॲण्ड सोप कंपनी.**

पी. डिपार्टमेंट. भायखळा मुंबई.

that Napoleon ever laughed. Nor can we imagine another of the most beautiful of human expressions upon the face of this saturnine egotist, that expression of disinterested interest that one sees in the face of an artist or artisan 'lost', as we say, in his work. Out of his portraits he looks at us with a thin scorn upon his lips, the scorn of the criminal who believes that he can certainly cheat such fools as we are, and withal with a certain uneasiness in his eyes. That uneasiness haunts all his portraits. Are we really convinced he is quite right? Are his laurels straight? He had a v st contempt for man in general and men in particular, a contempt that took him at last to St. Helena, that same contempt that fills our jails with forgers, poisoners, and the like victims of self-conceit. There is no proof that this unbrotherly, unhumorous egotist was ever sincerely loved by any human being. The Empress Josephine was unfaithful to him as he to her. His young Austrian wife would not accompany him to Elba. A certain polish countess followed him thither but not, it would seem, for love, but on account of the son she had borne him. She wanted settlements. She stayed only two days with him. He had never even a dog to love him. He estranged most of his colleagues and fellow generals. He had no familiar friend. No one who knew him felt safe with him In his intimacy, his unflinching self-concentration must have been a terrible bore. His personal habits were unpleasant; the moodiness of bad health came to him early. True it is

that his soldiers, who, save for a rare melodramatic encounters, saw nothing of him idolized their "Little Corporal". But it was not him they idolized, but a carefully fostered legend of an incredibly clever, recklessly brave little man, a little pet of a man, who was devoted to France and them."—p. 499.

लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं गुरपस्थ राजेशाहीला नेस्तनाबूद करणाऱ्या सवाई शिकंदर नेपोलियन चक्रवर्तीला विसाव्या शतकातले हे इंग्रज इतिहासपंडित जर बाबू चष्मावाल्याच्या वर्गात ढकलतात, तर १८ व्या व १९ व्या शतकांतल्या यांच्या व्यवसाय-पूर्वजांनीं शिवाजीला उनाडटप्पू दरोडेखोराच्या सदरांत घातले, तर त्यांत काय नवल ? तरी बरें, कीं इतरांवर घाणेरडे आरोप करणाऱ्या या आंग्ल चिकित्सकांच्या ब्रिटन राष्ट्राच्या साम्राज्यवर्धनाच्या खटपटी अगदींच कांहीं धुतल्या तांदळाच्या नव्हत. शिवाजीवरील खुनाच्या आरोपाचे खण्डन करणारे

## विलायती व गांवठी वकील

पाहिले तर त्यांची नंदीबैलांतच गणना करावी लागेल. यांचा डिफेन्स आणि विधानें पाहिलीं तर रडूं येण्यापेक्षां हसूंच फार येते. काय म्हणे, शिवाजीनें आत्मसंरक्षणासाठीं वाघनखाचा उपयोग केला. आणखी काय ? तर प्रथम वार कोणी केला, यावरच वादविवादाची धुमश्चक्री. आणि अफजुलखानानें ज्या अर्थी, ज्या पक्षीं, ज्या अन्वयें, शिवाजीला प्रथम बगलेंत दाबून त्याच्या मस्तकावर प्रथम तलवार चालवून आगळीक केली, त्या अर्थी त्या पक्षीं, त्या अन्वयें, शिवाजीनें आत्मरक्षणार्थ वाघनख चालविल्यामुळें, खुनाचा आरोप त्यावर सिद्ध होत नाहीं. बावलानें

रिवॉल्वर प्रथम झाडलें, का शफी दिघ्यानें झाडलें, असल्याच क्षुद्र वादावर या विलायती व गावठी वकीलांची भिस्त. जणूं काय, अफजुलखानाच्या खुनाबद्दल फाजलखानानें फिर्याद दिली आहे. अदीलशाहीच्या शिफारसीनें इंग्रेजी सेशन कोर्टांत शिवाजीवर खटला चालू आहे आणि हे विलायती गावठी बॅरीस्टर शिवाजीच्या तर्फे ब्रिटाश इंडियन पिनल कोडांतील कलमांवर आपल्या वकीली· ईची कसरत करीत आहेत! शिवाजी हा कोण, त्याचें ध्येय काय, कर्तव्यक्षेत्र कोणतें, त्याच्या कृत्यांची परीक्षा कोणत्या दृष्टीकोणानें केली पाहिजे, इत्यादि महत्त्वाच्या मुद्यांची आणि या वकीलांची फारकतच असल्यामुळें, त्यांनीं साध्या संसाऱ्याला लागूं पडणाऱ्या नीतिनियमांच्या कक्षेत या राष्ट्रसंसाऱ्याला ओढावे, यांत त्यांच्या बुद्धिमांद्याशिवाय विशेष कांहींहि निष्पन्न होत नाहीं. राष्ट्रसंसाऱ्यांना कर्तव्याकर्तव्याची जीं बिकट लांगडी सोडवावी लागतात, तीं ते कोणत्या भूमिकेवरून कशी सोडवितात, याचें परोक्ष ज्ञान या लौकिकी नीतिवंतांना नसल्यामुळेंच, ते ' जन्माला आला हेला, कसा तरी जगून मेला ' अशा साध्यासुध्या संसाऱ्याच्या भूमिकेवरून शिवाजीसारख्या राष्ट्रसंसाऱ्याच्या कर्माकर्माचें परीक्षण करण्याच्या पोरकट फंदांत पडतात. सतत पांच वर्षे युरपियन महायुद्ध मर्दुमकीनें खेळविणाऱ्या जर्मन कायझर वर खटला भरण्याच्या पाचकॅळ वल्गना असल्याच क्षुद्र बुद्धीची अवलाद होय. ही क्षुद्र बुद्धीची उर्फ नीतीची चोड बाळगणारांनीं खुशाल धंदेवाईक पुराणिक म्हणून मिरवावे. पण त्यांनीं स्वराज्यसंस्थापक राष्ट्रवीरांच्या चारित्र्याची चिकित्सा करूं नये. तें त्यांचें क्षेत्र नव्हे, तो त्यांचा अधिकार नव्हे.

## वाकड्या दरांत वांकडी मेढ

ठोकणारेच पुरुषोत्तम राष्ट्रवीर होऊं शकतात. तें साधुसंतांचें आणि 'सत्य सदा बोलावें 'वाल्यांचें तोंड नव्हे. साधुवृत्तीनें आणि संसारी नीतीनें राज्यें कमाविल्याचा दाखला इतिहासांत नाहीं. राज्याची प्राणप्रतिष्ठा म्हणचे टाळकुट्या साधुसंतांची भजन-प्रतिष्ठा नव्हे. त्यांतल्या त्यांत गुलाम बनलेल्या देशाची मढिरलेली मनोवृत्ति चैतन्यपूर्ण करून परकीय सत्तेच्या मुडद्यावर स्वराज्याचा पाया उभारणारा वीर साधुवृत्तीचा असून भागतच नाहीं. असें आजपर्यंत कधिं कोठें घडलें नाहीं. पुढें कधिं कोठें घडणार नाहीं. "एका गालावर कोणी चापड मारली तर लागलाच दुसरा गाल पुढें कर ' या क्रिस्त धर्माज्ञेप्रमाणें गुरपस्थ क्रिस्तीजन अक्षरशः वागते, तर त्यांना हिंदुस्थानचें साम्राज्य कधींच मटकावतां आलें नसतें. महंमद गिझनी पासून तों थेट बाबर हुमायुना पर्यंतचे लोक जर नुसते माळा ओढणारे आणि नमाज पडणारे मुल्ला मौलवी असते तर मोगल साम्राज्याची स्थापना होतीच ना. त्याचप्रमाणें सत्य नीति वचन इमान असल्या साधुवृत्तीच्या फाजील फंदांत रजपूत जर निष्कारण गुरफटलें नसते, तर त्यांचाहि अधःपात इतक्या लवकर खास झाला नसता आणि शिवाजी जर दगलबाजांतला दगलबाज, लुच्चांतला लुच्चा, खटांतला सवाई खट आणि उद्धटांतला दिढी दुपटी उद्धट नसता, तर त्यालाहि मऱ्हाठी स्वराज्य यावज्जन्मांत स्थापन करतां आलें नसतें. नेहमींचा व्यवहार पाहिला तरी

## सतीच्या घरीं वत्ती

आणि वेश्येच्या घरीं झुले हत्ती, हाच प्रकार चालू असतो. सत्य न्याय समता प्रामाणिकपणा इत्यादि तत्वें पुराणांसाठींच जन्माला

आलेलीं आहेत. लिहिण्या बोलण्यांत त्यांची फोडणी फार खमंग लागते. एखाद्या गोमाजीच्या चारित्र्यावर थोरपणाची सफेदी चढवून, त्याच्या चरित्राचे ग्रंथ ' विक्रीला लायक ' ठरविण्याच्या कामीं, हीं तत्वें लेखक बखरकारांना शाई लेखणी इतकीच उपयुक्त असतात. परंतु, प्रत्यक्ष व्यवहारांत या तत्वांनीं आजवर एकाहि मनुष्याचा भाग्योदय केल्याचें उदाहरण आढळणार नाहीं. अमक्या तमक्यानें म्हणे ५ दिडक्यावर भाजीविक्याचा धंदा आरंभून १५ वर्षांत तो लक्षाधीश झाला ! फलाण्यानें डोक्यावर टोप्यांचे शिखर घेऊन टोप्या विकतां विकतां, अमूक वर्षांत फेरीवाल्याचा म्हणे कोटयाधीश झाला ! गोम्यासोम्या म्हणे रस्त्यावर खडीच्या पाटया वाहात होता, तो आज हिंदुस्थानांतल्या सगळ्या रेल्वेचा कंट्राक्टर होऊन, रोल्स रॉईसशिवाय पाऊल बाहेर टाकीत नाहीं ! दहा वर्षांपूर्वी हातांत एक फुटका लोटा घेऊन नागडा उघडा भटकत आलेला मारवाडी म्हणे मोडतोड तांब्बा पित्तलवर आज अब्जाधिपति बनला ! आणि—आणि लोकांना दाखवायचें भासवायचें काय ? तर हे सगळे नरमणि सत्यं वद धर्मं चर इत्यादि गुणांच्या भांडवलावर बडे भांडवलवाले बनले ! हे सारे वज्रगाळ नीतिमत्तेचे पुतळे. पाप म्हणून यांच्या गांवीं नाहींच. व्यवहाराच्या खाच खळग्यांवरून जातांना ना कधिं यांचा पाय पापाच्या पिसावर पडला, ना कधिं घातपाताच्या वळणावर अडला. यांनीं प्रत्येक कर्म देवाधर्माची जाणीव ठेऊन केलेलें. यांचें इमान ? आहा ! तें काय विचारावें ? सगळे हरिश्चंद्राचे अवतार ! स्वप्नांत दिलेलीं वचनें सुद्धां जागे झाल्यावर फडशा पाडणारे ! पापभीरुत्वाच्या काचेच्या सीलबंद बरणींतल्या या साऱ्या धर्मवान् सत्यवान् नीतिवान् शीलवान् कापटया ! बिचाऱ्यांना पापाची नुसती झुळूक सुद्धां कधिं चाटून गेलेली नसायची. फिटसन दिव्याची मॅन्टलेच

ही ! आरपार उभा आडवा खालीं वर उजेडच उजेड आणि तेजच तेज. वाचकहो, असल्या गप्पा लुच्या गप्पिष्टांनीं माराव्या, पोटभरू किंवा रिकामटेकड्या लेखकांनीं लिहून प्रसार कराव्या आणि बावळट श्रोत्या वाचकांनीं नंदीबैलाप्रमाणें माना हालवून मान्य कराव्या, यापेक्षां त्यांत विशेष कांहींच नसते. कोण गोमाजी द्रव्यप्राप्तीच्या शर्यतींत काय काय लपंडावांनीं भरारतो, याचा तपशील पुष्कळांना अवगत असतो. परंतु व्यवहाराची मायाच अशी मायावी आहे कीं त्या तपशीलांचा उच्चार कोणी फारसे करीतच नाहीं. त्यांत पुन्हां त्या गोम्यासोम्याला लक्ष्मी प्रसन्न झालेली ! मग काय, सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते. अर्थात् संपत्तीच्या झगझगाटाखालीं दडलेला पापांचा आणि घातपातांचा भगभगाट उकरण्याच्या अव्यापारेषु व्यापारांत पडण्याची लोक सहसा तसदी घेत नाहींत. वकीलांचे वाडे विद्वत्तेच्या विजयावर बसले जातात काय ? स्मृतिग्रंथांत वकीलांच्या वृत्तीविषयीं घातलेले नीतिनिर्बंध जर अक्षरशः पाळले जाते आणि विद्यमान सरकारांनीं ठरविलेल्या वकीली फीच्या कोष्टकांतच जर त्यांचे द्रव्यप्राप्तीचे प्रमाण मर्यादित राहतें, तर बाराबंदी बंडी, मांडपंचा आणि गांधी टोपी पलीकडे एकाहि वकीलाचें ऐश्वर्य फुगलें नसतें. नोकरी चाकरी किंवा अर्थोत्पादनाचा कसलाहि लौकिकी धंदा न करतां, फक्त 'देशभक्त' म्हणून व्याख्यानबाजी आणि लेखनबाजी करीत जगणाऱ्या अनेक ब्राम्हण लोकांनीं ठिकठिकाणीं मोठमोठे वाडे बांधले आहेत, आणि सावकाऱ्याहि सुरू केल्या आहेत, त्या काय साऱ्या 'वन्दे मातरम्' राष्ट्रगीत पारायणाच्या तात्कालीक फलश्रुत्याच मानायच्या कीं काय ? आंगावर खादीच्या चिंध्या पांघरून देशासाठीं भिक्षा मागत गावोगाव व खेडोपाडीं भटकणाऱ्या संभावित भिक्षुकांच्या सौभाग्यवती गोटपाटल्यांत चमकतांना दिसतात, त्या काय खादीच्या

आडव्या उभ्या ताण्याच्या तणावावर कीं काय ? लिमिटेड कंप-न्यांची आणि देशी बँकांची दिवाळी वाजवून, कफल्लक अवस्थेंत नादारीची सनद पटकविणाऱ्या 'थोर' माणसांच्या नशिबीं नादारों-त्तर काळीं सुद्धां मोटारी बंगले शेतवाड्यांचें ऐश्वर्य तसेंच चिकटून राहिलेले आढळल्यास, तो देखिल नीतिमत्तेचा एक श्रुतिस्मृति-पुराणोक्त दिग्विजयच मानायचा कीं काय ? नीतिनियमांचीं पुराणें आणि लौकिकी व्यवहारांचीं गुप्त अर्धगुप्त वा उघडगुप्त धोरणें; यांचा समन्वय लावण्याचें काम म्हणजे या जगांतलां एक ब्रम्ह-घोटाळाच होय. तात्पर्य, लौकिकी व्यवहार जसा दिसतो, तसा वास्तविक मुळींच नसतो, म्हणूनच बावळट माणूस बोलबोलतां सपशेल फसतो. जीवो जीवस्य जीवनम्. मोठ्या माशानें धाकट्या मासोळीला मटकावून जगावें. ज्ञान्यांनीं अज्ञान्यांचीं घरेंदारें लुटून आपले वाडे शृंगारावे. जबरदस्तांनीं कमकुवतांना जिंकून दास बनवावे. सत्य न्याय प्रेम अहिंसेची कास वळकट धरणाऱ्या नामर्द षंढांना युक्तिबाज दगलबाज बाजीरावांनीं हासत हासत चिरडून जमीनदोस्त करावे. ज्याच्या हातीं शिकार त्यानें पारधी म्हणून मिर-वावे. हाच जेथें सृष्टींत चाललेल्या 'जगण्याच्या धडपडीं'चा आत्माराम, तेथें एका चोरानें दुसऱ्या चोरावर दगलबाजीचा आरोप करावा, ही तरी दगलबाजीच नव्हे काय ?

## दगलबाज नाहीं कोण ?

दुनियाच जेथें जातिवंत दगलबाज, तेथें दगलबाजीशिवाय जगणारे प्राणी म्हणजे षंढ हिजडे नामर्द विद्वान आणि गुलाम हेच होत. या लोकांशिवाय, नेटका प्रपंच करून मरण्यापूर्वी वेळ सांपडलाच तर परमार्थ-विवेकाचा फेरफटका करणारे छोटे दगल-बाज संसारी, रोजच्या संसारांतल्या जगण्याच्या धडपडींत जे जे

उत्पात करतात, त्यांचा विचार केला म्हणजे उलट्या काळजाच्या रंडीबाज (वारांगनेव) राजकारणांतल्या बड्या दगलबाज दिग्गजांच्या उत्पातांचें प्रमाण सहज कळून येईल. साध्यासुध्या संसारांत एकमेकांच्या मुंड्या मुरगाळल्याशिवाय जर संसाऱ्यांना जगतांच येत नाहीं; कापड मोजतांना गजाला आणि माल तोलतांना तराजूला हिसका दिल्याशिवाय जर आमच्या व्यापारांतला अपमृत्यू टळत नाहीं; आणि खऱ्या खोट्याची भेसळ केल्याशिवाय, न्यायदेवतेनें दिलेली न्यायाची कांजी पिण्याची जर मनुष्याच्या जिभेला सवयच नाहीं; तर कोट्यवधि लोकांच्या संसाराच्या बरेवाईटपणाचा जिम्मा घेणाऱ्या राजकारणी संसाऱ्या नायकाला शक्तीयुक्तीबुद्धीची ठेवण कसल्या मनोवृत्तीच्या साच्यांतून ओतून काढणें अगत्याचें असतें, याची कल्पनाच करावी. जित-जेतृत्वाची घडामोड घडविणारें राजकारण हेंच मुळीं जेथें हरामखोरीच्या सट्टेबाजीचें क्षेत्र, त्या क्षेत्रांत स्वदेशाच्या भवितव्येचे खेळ खेळणाऱ्या खेळाडूंनीं, इंद्रधनुष्यालाहि चक्कर येईल अशा भरंसाट चित्रविचित्र रंगांत, हरामखोरीची आणि दगलबाजीची जुळेबाज रंगपंचमी खेळूं नये, तर काय सत्यं वद धर्मं चर वाल्या बेदर्द गोसावड्यांप्रमाणें राखेच्या ढिगाराची फाल्गुनी पौर्णिमा करावी? जगांत आजपर्यंत अशी एकहि राज्यसत्ता झालेली दाखवितां येणार नाहीं कीं जिचा पाया दगलबाजीवर उभारलेला नाहीं. सत्यव्रताची आणि न्यायाची मिजासच मारायची, तर एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला, गोऱ्या लोकांनीं काळ्या लोकांना, आणि पाश्चिमात्य लोकांनीं पौर्वात्य लोकांना हव्या त्या उपायांनीं जिंकून गुलाम करायचे, हा तरी कोठल्या गावचा न्याय? माणसांनीं माणसांना टचून त्यांच्या गुलामगिरीवर स्वतःच्या जेतृत्वाची शेखी मिरविणें, हीच मुळी सृष्टीच्या नियमांची जेथें धडधडीत पायमल्ली, तेथें

त्याच गुलामगिरीचें लोण सफाईत परतविण्यासाठीं कोणी काट्या-नेंच काटा काढला, तर त्यांत दगलबाजी ती कसली? जगाची रहाटीच जर उलट्या पावलांनीं चालत आहे, तर सुलटें चालण्यांत शहाणपणा कोणता?

## करत्याची करणी आणि मारत्याची तलवार

हीच जगाच्या जगण्याच्या धडपडीची गुरुकिल्ली आहे. याच गुरुकिल्लीनें शिवाजीनें महाराष्ट्राच्या नशिबाला चिकटलेली इस्लामी गुलामगिरी उध्वस्त करून, आपल्या मातृभूमीला हिंदवी स्वराज्याचें स्वातंत्र्य दिलें. यांत चुकलें कोठें? दगलबाजी ती कसली? अत्याचार कसले? खून तरी कसले? आणि विश्वासघात तरी कोठें घुसले? खटास खट भेटे, तेव्हांच मनींचा संशय फिटे. हिंदू लोक आचंद्रार्क मुसलमानी सत्तेचे गुलाम राहणार काय? शिवाजीच्या या प्रश्नाला तत्कालीन् प्रस्थापित राज्यसत्तेनें 'होय होय होय' अशा मगरूरीच्या प्रतिध्वनीचें उत्तर दिलें. त्यावर 'कल्पांत करीन, पण ही मगरूरी टिकूं देणार नाहीं. हिंदु स्वतंत्र झालाच पाहिजे.' अशी शिवाजीनें धडाडीची उलट सलामी दिली. हिंदु-स्थान आणि त्यावर राज्य-सत्ता म्हणे मुसलमानांची! या दगलबाज परिस्थितीचा नायनाट करण्यासाठीं शिवाजीला सवाई दिढी दुपटी दगलबाज बनल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. प्रस्थापित मुसलमानी राज्यसत्तेचा विध्वंस हीच ज्यानें आपल्या कर्तव्याची दिशा ठरविली, ज्या कर्तव्यांत त्यानें आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा आमूलाग्र संन्यास केला आणि ज्या कर्तव्यसिद्धीवर कोटयवधि जीवांचा ऐहिक मोक्ष अवलंबून होता, त्या कर्तव्यासाठीं—त्या गुलामगिरीचा कण्ठ काडकन् फोडतांना, अफझुलखानचसा काय, पण शिर्के मोरे जाधवासारखे स्वजातीय कंटक आडवे येतांच,

त्यांचेहि खून पाडणें, शिवाजीच्या राष्ट्रधर्माला आणि राजकारणी नीतीला मुळींच विसंगत नव्हते. फार काय, पण विजापुराहून अफझुलखान आला, त्याच प्रतिज्ञेनें व तयारीनें शिवाजीचा प्रत्यक्ष बाप शहाजी जरी आला असता, तरी हिंदवी स्वराज्यस्थापनेच्या महत्कर्तव्यासाठीं शिवाजीनें त्याचाहि कोथळा फोडून, आपल्या हातानें आपल्या मातोश्रीच्या कपाळचें कुंकू पुसायला कमी केलें नसते. राष्ट्रोद्धाराच्या पवित्र कर्तव्यक्षेत्रांत ध्येयाच्या सिद्धीसाठीं 'आडवा आला कीं काप' हाच जेथें नीतीचा दण्डक आहे, तेथें 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' या संसारी लोकांच्या आंबटवरणी नीतिचे नियम काय होत ?

## दगलबाजीशिवाय राज्यसत्ता नाहीं

आणि उलट्या काळजाशिवाय राजकारण नाहीं. स्वराज्यस्थापनेसाठीं आणि परदेश जिंकून साम्राज्यवृद्धी करण्यासाठीं आजपर्यंत दगलबाज्या केल्या नाहींत कोणी ? सर्वांनीं केल्या. कोणीहि नाकाला जीभ लावण्याचा खटाटोप करूं नये. स्वतंत्र अमेरिकन संस्थानांची प्राणप्रतिष्ठा, ब्रिटीश रक्ताच्या लोकांनीं ब्रिटीश सत्तेला उलथूनच केली ना ? कोठें गेला तो रक्ताचा जिव्हाळा त्या वेळीं ? आर्यांनीं जसा अनार्यांचा बीमोड करून हिंदुस्थानांत तंगड्या पसरल्या, तद्वत याच अमेरिकन वसाहतवाल्यांनीं रेड इंडियनांच्या कत्तली व विध्वंस केला, तो शुद्ध युनिवर्सल ब्रदरहुड (विश्वबंधुत्व) च्याच भावनेनें काय ? मुसलमानांनीं सत्तामदाच्या धुंदींत हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचें बरेंच तिखटमिठाचें वर्णन आपण बखरी नाटकें कादंबऱ्यांतून वाचतो. परंतु पुर्तुगेज डच इंग्रेज फ्रेंच या क्रिस्ती राष्ट्रांच्या अेरावांनीं हिंदुस्थानांत केलेल्या अत्याचारांपुढें तें कःपदार्थ ठरेल. पुर्तुगेजांचा प्रपितामह वास्को द गामा यानें आपल्या दुसऱ्या

सफरींत झामोरीनच्या वतीनें स्वागत देण्यास आलेल्या ब्राम्हण वकीलाचे कान कापून, तेथें कुत्र्याचे कान शिवले. आपल्या पुर्तुगेज राष्ट्राचा दरारा दाखविण्यासाठीं बेसावध कालीकट बंदरावर तोफांचा भडीमार केला. बंदरांतील जहाजे लुटून, त्यांच्या ८०० नावाड्यांचे नाक कान कापले. सोट्यांनीं दांत पाडले. तोडलेले सर्व अवयव ताटांत भरून त्या ब्राम्हण वकीला बरोबर 'याची भाजी करून खा' या निरोपासह झामोरीनकडे पाठविले. शिवाजीनें अशा प्रकारचीं राक्षसी कृत्यें कधिं कोठें केलेली असल्यास त्याच्या निंदकांनीं खुशाल पुरावे पुढें आणावे. आफान्सो आलबुकर्कनें तिमय्या गरसप्पा नांवाच्या देशद्रोही हिंदु राजाच्या मदतीनें गोवा काबीज केल्यावर, आपल्या सत्तेचा वचक दाखविण्यासाठीं तेथल्या मुसलमान रहिवाशांची व निरपराधी बायकामुलांची सर्रास कत्तल करून दिल्लीच्या नादीरशहालाहि लाज आणली. क्रिश्चन धर्माच्या प्रसारार्थ उरल्या सुरल्या अनाथ मुसलमान विधवांचीं पोर्च्युगीज पुरुषां बरोबर बळजबरीचीं लग्ने ठोकून, गोव्यांतील लोकविश्रुत हाफकास्ट पोर्च्युगीज प्रजा निर्माण केली. वेढ्यांत सांपडलेल्या किंवा लढाईंत जिंकलेल्या वृद्ध, मुलें व स्त्रियांबद्दल शिवाजीचा दयावंत दण्डक मशहूरच आहे. हिंदु देवळांच्या विध्वंसनासाठीं नोरोन्हानें केलेली साष्टीतली कत्तल क्रिस्ती धर्माच्या व येशू क्रिस्ताच्या 'प्रेमपूर्णत्वा'ला कशी काय साजली शोभली, हें क्रिस्ती धर्ममार्तंडांनींच सांगावें. मुसलमानांच्या मशिदींबद्दल शिवाजीनें हेंच क्रिस्ती धोरण ठेवलें असतें, तर

## म्यूझिक बिफोर मॉस्क

मशिदींपुढें वाद्यांचा प्रश्न आज निघालाच नसता. पण शिवाजी म्हणजे हिंदुधर्माचा मूर्तिमंत मोहरा ! पवित्र कुराण हातीं पडतांच

तो त्याचीं पालखींत वाजतगाजत सन्मानपूर्वक परतवणी करील असे. दक्षिणेंतील कित्येक मशिदींना शिवाजीनें दिलेली वर्षासनें आजहि चालू आहेत. दुसरे पुर्तुगेज अरेराव म्हणजे आजाविडो साहेब. " हिंदुस्थानांत त्यानें केलेला दुष्टपणा अतर्क्य आहे. सीलोनांतील जयप्राप्तींत त्यानें आयांकडून त्यांचीं मुलें जात्यांत घालून दळिली. शिपायांकडून कांहीं मुलें भाल्याचे टोकांवर नाचवून, त्यांचे हाल पाहून तो आनंद मानी." धर्मप्रसारासाठीं साधूंचे पेहराव केलेल्या क्रिश्चन हरामखोरांची राजकारणी कृष्ण कृत्यें आम्ही पामर हिंदूनें काय वर्णन करावी ? युरपियन संस्कृतीच्या व क्रिश्चन धर्माच्या तोंडाला आचंद्रार्क काळीमा फासणाऱ्या इंक्विझिशनचे अत्याचार क्रिस्ती धर्म व सत्ताप्रसारक अरेरावांनीं हिंदी लोकांवरहि गाजविण्यास कमी केलेले नाहीं. डच लोकांनीं आंबोयना येथें इंग्रेज लोकांची केलेली कत्तल आणि टॉवरसन, बोमॅन्ट, जॉनसन, जॉन क्लार्क प्रभृतींवर केलेले पाशवी अत्याचार वाचले, तर दगडालाहि पाझर फुटेल. पलित्यानें सर्वांगाला डागण्या देणें, उलटे टांगणें, पायांस हातांस कोपरावर खाकेंत मेणबत्त्यांचे चटके देऊन मांस बाहेर काढणें, त्या जखमा धुवायच्या नाहींत, औषधपाणी करायचें नाहीं, मग त्यांत किडे पडून दुर्गंधी सुटायची व किडे सर्व शरीरावर वळवळत फिरायचे. असल्या ' आंबोयना ' अत्याचारांची इंग्रेजांची आठवण कशानें बुजणार ? पुर्तुगेज आणि डचां पेक्षां फ्रेंच आणि इंग्रेज जरा विशेष शहाणे.

## दगडापेक्षां वीट मऊ.

यांनींहि अत्याचार केले नाहींत, असें नाहीं. पण, डावपेचाच्या दगलबाजीवर यांचा भर विशेष. शारीरिक अत्याचारांपेक्षां बौद्धिक अत्याचारावर त्यांची धोरणें फार. रॉबर्ट क्लाईव्हनें वाटसन साहे-

बाची खोटी सही करून उमीचंदाला तर धडधडीत बनावट दस्त-ऐवजानें फसविलें. वॉरन हेस्टिंग्जनें अयोध्येच्या बेगमांचा केलेला छळ व इतर अत्याचार तर जगप्रसिद्धच आहेत. लॉर्ड डलहौसीनें कलमांच्या फटकाऱ्यानें आणि

## तू नाहीं तर तुझा बाप

320.

अशा सबबीवर मोठमोठी देशी राज्यें भराभर ब्रिटीश सत्तेच्या पचनीं पाडली. ५७ च्या बंडांतल्या हिंदी लोकांवरील इंग्रेजी अत्याचारांनीं पुर्तुगेज डचांच्या आठवणीलाहि मागें सारलें. परवाची जालियनवाला बागेची कत्तल म्हणजे आंबोयनाचीच प्रतिमा नव्हे काय? या सर्व अत्याचारांच्या कृतघ्नतेपुढें आणि क्रौर्यापुढें शिवाजीनें केलेला अफझुलखानाचा वध म्हणजे ढेकूण चिरडण्या इतकाच क्षुद्र ठरेल. शिवाजीवर किंवा सर्रास हिंदु नृपतींवर दगलबाजीचे आरोप करणाऱ्या इंग्रज इतिहासकारांना रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड डलहौसी इत्यादि अनेक राजकारणी महापुरुषांची कारस्थानें साजरी गोजरी वाटण्याचें आम्हाला तरी एवढेंच कारण दिसतें कीं, त्यांनीं 'दगलबाजी' या उर्दू-मराठाशब्दाला 'डिपलोमसी' हा एक गोंडस इंग्रेजी शब्द प्रचारांत आणलेला आहे. त्याच्या पोटांत स्वर्ग नरकासह सारें विश्व पचनीं पडलें तरी त्याला अजीर्ण म्हणून कधीं व्हायचेंच नाहीं.

## डिपलोमसी ऊर्फ दगलबाजी

ही राज्यक्रांतीची जीवनदेवता आहे. हिच्या उपासनेनें स्वराष्ट्राच्या भाग्यसिंधूला अपरंपार भरती आणणाऱ्या सर्व डिपलोमॅटांची क्षुद्र लौकिकी नीतीच्या चव्हाटयावर चिकित्सा करणें, चिकित्सकांच्या

क्षुद्र मनाचें द्योतक होय. डिपलोमॅट ऊर्फ राजकारणी दगलबाजांना संसारी नीतीच्या दण्डकाखालीं खेचले, तर पृथ्वीवरील कोणत्याहि चक्रवर्ति नृपतीच्या आणि लोकशाहीप्रभृति राज्यसत्तेच्या तोंडाला फासायला काळ्याशिवाय दुसरा रंगच उरणार नाहीं. अर्थात स्वराज्य-संस्थापक आणि साम्राज्य-प्रसारक राष्ट्रवीरांच्या चारित्र्याकडे पहाण्याची

## ही दृष्टीच चुकीची आहे.

स्वदेशाच्या सौभाग्याचें आणि स्वातंत्र्याचें अत्युच्च आणि व्यापक ध्येय साधण्यापलीकडे राष्ट्रवीरांना स्वतःचा स्वार्थ असा कांहींच नसतो. स्वार्थाचा संन्यास करून कोट्यवधी स्वदेश बांधवांच्या हितासाठीं झगडतांना, त्यांच्या हातून घडतील त्या बऱ्या वाईट कृत्यांची परीक्षा संकुचित अशा संसारी नीतीच्या दुर्बिणींतून करणें, सपशेल चुकीचें आहे. पुष्कळ वेळां राष्ट्रसेवेच्या व्यापक ध्येयासाठीं झगडणाऱ्या जातीवंत क्षुद्रांकडून अमानुष कृत्यें घडतात. नाहीं असें नाहीं. म्हणून काय या साऱ्या स्वराज्य व स्वधर्म सेवकांना क्षुद्र लेखायचे? हे अत्याचार त्यांनीं काय स्वार्थासाठीं केले? स्वार्थच मानायचा तर तो इतका महासागरा सारखा आहे कीं त्यांत त्यांच्या दोषांचें प्रमाण म्हणजे दर्यामे खसखस! कोणत्याहि राजसत्तेच्या पायांतले दगडधोंडे माती उकरून पहा, त्यांत खून रक्तपात अत्याचार विश्वासघात यांशिवाय दुसरें कांहींच आढळणार नाहीं. पर-राज्यांच्या मुंड्या मुरगाळल्याशिवाय स्वराज्याची मान ताठ बसत नाहीं. परक्यांच्या घरादारांच्या होळ्या केल्याशिवाय आपल्या राजसत्तेच्या महात्म्याची दिवाळी साजरी होत नाहीं. वळी तो कानपिळी. कम-दगलबाज ऊर्फ बेअक्कल लोकांनीं सवाईसोट्या दगलबाज लोकांच्या सत्तेखालीं निमूटपणें

वेचले जावे, हा निसर्गाचा दण्डकच आहे. तात्पर्य, दगलबाजी हा यच्चावत् सर्व राज्यसंस्थापकांचा मुख्य सद्‌गुण आहे. हा सद्‌गुण ज्यांच्या अंगीं विशेष, तेच पुरुषोत्तम प्रत्येक देशाच्या नवमन्वंतराचे शककर्ते म्हणून इतिहासांत चिरंजीव होऊन बसले आहेत. विश्वासघात बेइमान खून अत्याचार जाळपोळ इत्यादि गोष्टी पौराणिकी ग्रंथांच्या किंवा शाब्दिक वादाच्या क्षेत्रांत अत्यंत अमानुष मानलेल्या असल्या, तरी राजकारणी क्षेत्रांत त्यांची सद्‌गुणांत गणना होत असते.

## शांतीसाठीं महायुद्ध

ही शब्द योजना तरी किती परस्परविरोधी ? रक्तपात टळावे म्हणून रक्तपात. चोऱ्या बंद व्हाव्या म्हणून घरा दारांवर दरवडे. राजावर प्रेम करावयास शिकविण्यासाठीं राजद्रोहाच्या खटल्यांचीं सत्रें. हीं वाक्यें सकृद्दर्शनीं नागव्या विरोधाभासाची दिसतात. पण त्यांतच वास्तवीक राजकारणी दगलबाजीच्या सद्‌गुणाचें खरें बीज आहे. नदीच्या मुळाप्रमाणें आणि ऋषीच्या कुळाप्रमाणें कोणत्याहि राजसत्तेचें मूळ शोधण्यांत अर्थ नाहीं. या मुळांत कसकसलीं खतें पडलेलीं असतात, त्याचें पृथःकरण भल्यानें करू नये. म्हणूनच राजकारणपटु आंग्ल मुत्सद्दी एडमंड बर्क यानें 'सर्व राजसत्तांच्या उगमांवर पावित्र्याचा पडदा सोडून देणेंच श्रेयस्कर आहे' असा इषारा दिलेला आहे.

राजकारणांत कितीहि घातपात आणि दगलबाजी असली, तरी अखेर तें विजयी व्हावें लागतें. तें विजयी झालें तरच त्या दगलबाजीवर आणि घातपातावर पडदा पडतो. इंग्रेजींत एक सूत्र आहे:-One murder makes a villain, thousands

a warrior. एक खून केला कीं माणूस खुनी ठरतो, आणि त्यानें हजार खून पाडले कीं तो वीर योद्धा म्हणून गणला जातो. या छोट्या सूत्रांत बडा वेदान्त आहे. स्वदेशाच्या स्वातंत्र्या-साठीं राजकारणी दगलबाजीनें झगडणाराला यशापयशाची पर्वा नसली, तरी त्याची केव्हांहि हमी देतां येत नाहीं. बोलून चालून ती सट्टेबाजी. सरळ पडे दान, त्याची जगांत ताठ मान. दान पडे वाकडे, त्याच्या जिवावर साकडे. यंग टर्की नावाची एक पार्टी काढून राज्यक्रांति करूं पाहाणारा केमालपाशा सुरवातीला 'अपस्टॉर्ट अनार्किस्ट' उपटशुंभ बंडवाला म्हणूनच मानला गेला होताना? पण त्याच्या शिकंदर नशिबानें त्याच्या तलवारीला सरळ दान देतांच, आज त्याचा महिमा केवढा वाढला तो पहा आणि वाकडे दान पडलेल्या रिफांचा पुढारी अबदुल करीम याची काय अवस्था झाली ती पहा. दोघांचे उद्देश एकच. दोघेहि मर्द लढवय्ये. दोघेहि पट्टीचे राजकारणी दगलबाज. पण यशापयशाच्या चढत्यापडत्या झोल्यांत एक 'जवानमर्द मुस्तफा' बनला आणि दुसरा बाबू चष्मे-वाल्याच्या सदरांत पडला! एवढा मोठा शककर्ता चक्रवर्ति नेपो-लियन. साऱ्या युरपांतले राजेशाहीचे मुकूट टाचेखालीं चिरडणारा लोकशाहीचा प्रणेता. पण अखेर स्वदेशद्रोह्यांच्या कारस्थानामुळें वाटरलूच्या समरांगणावर त्याचें हुकमी दान हुकतांच इंग्रेज जेत्यांनीं त्याची कशी काय विल्हेवाट लावली? इंग्रेजी राजनीतीचें खरें स्वरूप या एकाच गोष्टीवरून फार स्वच्छ कळून येते. हिंदूंची राजनीति पडत्या प्रतिस्पर्ध्याचा सन्मान राखते, तर प्रतिस्पर्धी पराभूत होतांच आंग्ल राजनीति त्याला रसातळाला नेते. भारतीय महायुद्ध संपल्या-वर विजयी पांडवांनीं धारातीर्थीं पतन पावलेल्या कौरवांना श्रद्धा-पूर्वक तिलांजुली व पिंडदान केले. इंग्रेजांच्या सांस्कृतिक इतिहासांत श्रद्धेची ही भावनाच नसल्यामुळें, ते कधीं आपल्या पराभूत

प्रतिस्पर्ध्याला पिंडदान तर करणार नाहींतच, पण दुसरा कोणी तें करील तर तेंहि त्यांच्या प्रवृत्तीला परवडत नाहीं. नेपोलियन, जोन ऑफ आर्क, शिवाजी वगैरे थोरथोर राष्ट्रवीर वीरांगनाबद्दल आंग्लेतिहासकार जे इतक्या क्षुद्रतेचे आणि उपहासाचे उद्गार काढतात, त्याचें मूळ या त्यांच्या आनुवंशिक संस्कृतींत आहे. आजला प्रत्येक देशी संस्थानाकडे क्षुद्रतेच्या दृष्टीनें पहाण्याची जी एक प्रवृत्ति खुद्द हिंदु लोकांतच फैलावली आहे, ती सुद्धां या इंग्रजी आनुवंशिक संस्कृतीच्या शाबरी सांसर्गाचाच परिणाम होय. आयर्लंडच्या भवितव्यतेंत क्रांति वडविणारा डि व्हॅलरा आणि इटलीच्या भाग्याची घटना करणारा मुसोलिनी यांच्याविषयीं नित्य बाहेर पडणारे आंग्लोद्गार विचारांत घेतल्यास, परोत्कर्षासहिष्णुता आणि इंग्रेजी मनोवृत्ति यांची छत्तिशी स्पष्ट सिद्ध होते. या छत्तिशींत शिवाजी दगलबाज ठरला तर त्यांतहि त्या राष्ट्रवीराचा सन्मानच होत आहे. कारण

## शिवाजी विजयी दगलबाज होता.

हिंदुस्थानांत एक वेळ दगलबाज आर्यांनीं कमदगलबाज अनार्यांना पादाक्रांत केले. त्यानंतर, हिंदु राज्यकर्त्यांची दाणादाण उडवून मोंगलांनीं आपली दगलबाजी वरचढ ठरविली. पुर्तुगेज फ्रेंच डच व इंग्रेज यांमध्येंहि परस्पर दगलबाजीच्या शर्यती लागून, त्यांत अखेर इंग्रेजांचा घोडा पहिला आला. कांहीं वर्षे दख्खनच्या मुसलमानी शाह्या 'आम्ही पट्टीचे दगलबाज' म्हणून महाराष्ट्रभर आपल्या सत्तेचा धुमाकूळ घालीत होत्या. शिवाजीनें बोलबोलतां त्या सत्तेला उध्वस्त करून खुद्द दिल्लीच्या काळजाला हात घातला आणि मुसलमानांपेक्षां आम्ही

## मऱ्हाठे दिढी दुपटी दगलबाज

आहेंत, याची जाहीर नौबद रायगडावरून ठोकली. पुढें मऱ्हाठशाही दगलबाजीचा धौशा पेशव्यांनीं थेट अटकेला नेऊन भिडविला. अखेर इंग्रेजांच्या मार्जार-तपश्चर्येवर नियतिदेवतेची बहाल मर्जी झाली. त्यांनीं मऱ्हाठे मोगल शीख रजपूत इत्यादि सर्व दगलबाजोपदगलबाजांना आपल्या तंत्रशक्तीनें चीत करून, ब्रिटीश सत्तेच्या बिनमुखी स्थापनेनें, चालू युगांत

## इंग्रज म्हणजे दगलबाजाग्रणी

ऊर्फ मास्टर डिप्लोमॅटस् हा सिद्धांत बिनतोड प्रस्थापित केला. आज इंग्रेजांच्या दगलबाजीला जोड नाहीं आणि तोडहि नाहीं. आज तिला अवघें त्रिभुवन थोंकडें पडलें आहे. सर्व जगांतलें राजकारण आज इंग्रेजी दगलबाजीच्या पाणपोयीवरच आपल्या उलट सुलट पेचांचें पाणी पीत असते. या पाण्याला पाणी पाजण्याचें पाणी आज कोणांतही नसल्यामुळें, इंग्रेजेतर सर्व राष्ट्र पाण्यापेक्षां पातळ झालेली आहेत. आज पाश्चिमात्य इंग्रेज लोक ठरवतील ती पूर्व ठरत आहे. ब्रिटीश साम्राज्याचा हा विस्तार व दरारा प्रस्थापित करण्याच्या कामीं लक्षावधि इंग्रेजांनीं स्वार्थाचा होम केलेला असल्यामुळें, त्यांच्या पायांत पडलेल्या अनंत अत्याचारांना व घातपातांना आज मानवी स्मृति कवडीचेंहि महत्त्व देत नाहीं.

यावर कित्येक अशी शंका काढतील कीं जीं कर्मे नीतिग्रंथांत अकर्मे अथवा कुकर्मे म्हणून गणलीं जातात, तीं उघड माथ्यानें आचरून, नरपति हयपति छत्रपति चक्रवर्ति इत्यादि अत्युच्च

पदाला पोहचणाऱ्या पुरुषांना थोर कां मानावें? केवळ ते जबरदस्त सत्ताधीश बनतात म्हणून कीं काय ? नीति न्याय सदाचार यांना लाथाडून मिळविलेल्या श्रेष्ठ पदाची महति जगानें काय म्हणून मानावी, आणि इतिहासानें ती मानावी ? हव्या त्या अमानुष अत्याचारांवर व घातपातांवर केवळ राजकारणाची सफेदी चढतांच त्यांच्या क्रौर्याची आणि राक्षसीपणाची तीव्रता वितळून जाते, तर मानवतेचा सुरक्षितपणा म्हणजे एक भयंकर धोक्याचा सौदाच म्हटला पाहिजे ! वाटेल तें कुकर्म राजकारणाचा शिक्का पडतांच, चलनी नाण्याप्रमाणें जर जगाच्या बाजारांत विनतक्रार चालतें, तर

## नीतिशास्त्र म्हणजे नाटक का तमाशा ?

सत्कर्म तें सत्कर्म आणि बदकर्म तें बदकर्म ! सकृद्दर्शनीं ही शंका वाजवी दिसते. परंतु—त्यांत एक 'परंतु' आहे आणि या 'परंतू'चें कोडें शेकडां ९९ प्रापंचिकांना उलगडत नसल्यामुळें, कर्म कोणतें आणि अकर्म कशाला म्हणावें, याचा समाधानकारक निर्णय त्यांना लावतां येत नाहीं. संसाराच्या रोजच्या क्षुद्र दलामलींत सुद्धां 'हें बरें का तें खरें' 'असें करूं का तसें करूं' आणि 'कसें करूं काय करूं' याचा माणसाला उलगडा होत नाहीं. मोटमोठ्या पंडितांचीहि निर्णयशक्ति पुष्कळ वेळां लंजूर पडते. अशा वेळीं मोहग्रस्त माणूस वाटेल त्यावर वाटेल ते आरोप करून, आपल्या संशयी मनाचें कसें तरी समाधान करून घेतो. अहिंसा, सत्य, अस्तेय, कायावाचामनाची शुद्धता आणि इंद्रिय-निग्रह हीं पांच सनातन नीतिधर्माचीं तत्वें खरीं; परंतु, त्यांच्याहि आचरणांत अपवादांचीं अनेक स्थळें आहेत. सामान्य नियम आणि अपवाद यांचा न्यायशुद्ध आणि विवेकमान्य विचार नीतिशास्त्रानें मुळींच केलेला नाहीं, असें खास नव्हे. अहिंसा परमो धर्मः ही गोष्ट

कितीहि खरी असली तरी जगाच्या व्यवहारांत कर्तव्याची अशी अनेक क्षेत्रें आहेत कीं तेथें हिंसा हाच परम धर्म ठरविणें प्राप्त असते; आणि नीतिशास्त्र त्यालाच आपली मान्यता देते. संसार-मग तो एका कुटुंबाचा असो, वा विशाळ राष्ट्राचा असो-त्यांत नित्य भेटणाऱ्या कर्माऽकर्मांची त्रांगडी कशी सोडवावी, याचा बाल-बोध उलगडा अखिल मानवतेला व्हावा, एवढ्याच साठीं

## श्रीमद्‌भगवद्‌गीताशास्त्र अवतरलें

आहे. सर्व उपनिषद्रूपी कामधेनूंचें अमृतमय दुध घुसळून, श्रीकृष्ण भगवंतानें गीतारूपी आत्मप्रबोधक नवनीत काढलें. कै. बाळ गंगाधर टिळक यांनीं अत्यंत कुशलतेनें त्या नवनीतांत आपल्या अलौकिक बुद्धीमत्तेची पत्रीची खडीसाखर मिसळून 'गीतारहस्य' नामक स्वादिष्ठ आणि खमंग असा षोडस रसी माधा तयार केला. त्यांतील ' कर्मजिज्ञासा ' नामक प्रकरणावरून सत्य-असत्याची व हिंसा-अहिंसेची गीतोक्त मीमांसा येथें सारांशानें नमूद करीत आहों.

नीतिशास्त्र कितीहि कडकडीत असलें, तरी त्यांतहि अपवादांचा विवेकानें विचार केलेला आहे. सामान्य नियमाला अपवाद हे असायचेच. सत्य बोलावें हा परम धर्म. त्याविषयीं वादच नाहीं. परंतु, आजूबाजूचा कसलाहि विचार न करतां, परिस्थिति प्रसंग आणि परिणाम यांची दखल न बाळगितां, केवळ परमोच्च धर्म म्हणून सत्य बोलणारा माणूस सत्याग्रही असला तरी पुष्कळ प्रसंगीं स्वतः गाढव तर ठरतोच, पण इतरांच्याहि नाशाला अगर घाताला कारण होतो. गाईच्या मागें कसायी लागला आहे. पळत पळत गाई आपल्या दृष्टीसमोर आडोशाला लपली. इतक्यांत ' गाई कोठें लपली ?' म्हणून कसायी तुम्हांला विचारूं लागला.

तर त्या वेळीं सत्याग्रहाच्या दिमाखानें तुम्ही सत्य सांगून गाईची हत्या करवाल, का असत्य सांगून तिचा प्राण वाचवाल? कांहीं मनुष्यें दरोडेखोरांच्या हातून निसटून, तुमच्या देखत दाट रानांत कोठेंतरी दडून बसली. भागाहून तलवारी परजीत दरवडेखोर येऊन तीं माणसें कोठें गेली, असें विचारूं लागले, तर काय जबाब द्याल? सत्य बोलाल का धडधडीत 'मला माहीत नाहीं' असें असत्य बोलून त्या गरीबांचा प्राण वाचवाल? सत्य बोलणें हा परमोच्च धर्म, तर निरपराधी प्राण्यांची हिंसा होत असेल तर त्याला हवें तें करून प्रतिबंध करणें, हाहि सत्याइतकाच परमोच्च धर्म! मग दोहोंपैकीं कोणता मार्ग पत्करावा? समजा, अखिल महाराष्ट्राच्या गुलामगिरीचे पाश कसे तोडावे, या एकाच ध्येयाला वाहून घेतलेले शिवाजी महाराज डोंगरी किल्ल्याच्या एका गुप्त खलबतखान्यांत कांहीं मसलत करीत बसले आहेत. बाहेर टेहळणीसाठीं एक धोंगड्या गुराखी बसविलेला आहेत. इतक्यांत एक विजापूरचा कोणीतरी चिरूटसिगारेटखान तेथें येतो आणि तलवार काढून विचारतो 'बताव कहां है मरगट्टा सेवाजी.' तर त्या धोंगड्या टेहळ्यानें, 'सत्य सदा बोलावें' म्हणून शिवाजीचा पटकन् पत्ता सांगून मोकळें व्हावें, का कानावर हात ठेऊन त्या चिरूटखानाच्या तलवारीला बळी पडावें? नीतिशास्त्रांतला विवेक दुसऱ्या प्रकाराला संमति देतो. "सत्य बोलणें हें प्रशस्त होय; पण सत्यापेक्षांहि सर्व भूतांचें ज्यांत हित असेल, तें बोलावें. सर्व भूतांचें ज्यांत अत्यंत हित तेंच माझ्या मतें खरें सत्य होय." चिरूटखानाच्या क्रोधाला टेहळ्या बळी पडला तर त्यात विशेष काय उत्पात घडणार! कांहीं नाहीं. एक सोडून लाख टेहळे मिळतील. पण कोट्यवधि मऱ्हाठ्यांच्या राष्ट्रीय भवितव्यतेचा विश्वकर्मा शिवाजी दुसरा मिळणें शक्यच नाहीं. शिवाजी ठार झाला कीं महाराष्ट्र मेला.

अशा महत्वाच्या राष्ट्रनायकाला जर त्या टेहळ्यानें दाखविला, तर त्याची ती वाणी अथवा करणी असत्याच्या व नीच नृशंसत्वाच्या सदराखालीं येऊन साऱ्या जगाच्या छी:थू:ला कारण होती. शांतिपर्वांत भीष्म युधिष्ठिरास सांगतात " न बोलतां मोक्ष म्हणजे सुटका होण्यासारखी असेल तर कांहीं झालें तरी बोलूं नये; आणि बोलणें अवश्यच असेल तर, किंवा न बोलल्यामुळें ( दुसऱ्यांस ) शंका येण्याचा संभव असेल तर, त्या वेळीं सत्यापेक्षां खोटें बोलणें अधिक प्रशस्त, असें विचारांतीं ठरलेलें आहे." 'अहिंसा सत्यवचनं सर्वभूतहितं परम्' ( वनपर्व २०६-७३ ) इंग्रेजी नीतिशास्त्रवेत्ते याच मताला पुष्टी देतात. [ १ ] मी खोटें बोलल्यानें प्रभूच्या सत्याचा महिमा जर अधिक वाढतो ( म्हणजे क्रिस्ती धर्माचा अधिक प्रसार होतो. ) तर त्यामुळें मी पापी कसा ठरणार ? ( रोम. ३–७ क्रिस्तशिष्य पॉल. ) [ २ ] माझ्या मतें कोणत्याहि कृत्याचा परिणाम काय होतो इकडे लक्ष पुरवूनच त्याची नीतिमत्ता ठरविली पाहिजे. खोटें बोलल्यानेंच एकंदरींत अधिक कल्याण आहे अशी जर माझी खात्री असेल तर सत्य बोलण्यास मी धजणार नाहीं; आणि ही खात्री अशा प्रकारचीहि असूं शकेल कीं त्या वेळीं खोटें बोलणें हेंच माझें कर्तव्य आहे असें मी समजेन. ( लेस्ली स्टीफन. ) अहिंसा परमो धर्मः हा सामान्य नियम बहुतेक सर्व धर्मांनीं मान्य केलेला आहे. " पितृवध, मातृवध, मनुष्यवध हे हिंसेचे घोर प्रकार. पण आतां असें समजा कीं, आपला जीव घेण्यास, किंवा आपल्या पत्नीवर अगर कन्येवर बलात्कार करण्यास, अथवा आपल्या घरास आग लावण्यास, अगर आपली सर्व दौलत व स्थिरस्थावर हरण करण्यास एखादा दुष्ट मनुष्य हातांत शस्त्र घेऊन सज्ज झाला व जवळ दुसरा कोणीहि त्राता नाहीं, तर असल्या 'आततायी' मनुष्याची आपण 'अहिंसा परमो धर्मः'

म्हणून डोळे मिटून उपेक्षा करावी, किंवा दुष्टास — तो सामोपचारानें ऐकत नसल्यास — यथाशक्ती शासन करावें? मनु म्हणतो —

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राम्हणं वा बहुश्रुतम्।
आततायीनमायान्तं हन्यादेवाविचारयन्॥

" असला आततायी म्हणजे दुष्ट मनुष्य — तो गुरु आहे, म्हातारा अगर पोर आहे, विद्वान् ब्राम्हण आहे, इकडे न पहातां — बेशक ठार करावा !" कारण, अशा वेळीं हत्येचें पाप हत्या करणारास लागत नसून, आततायी आपल्या अधर्मानेंच मारिला जातो. ( मनु. ८–३५०.)......भ्रूणहत्त्या म्हणजे कोंवळ्या पोराची हत्त्या सर्वांत अति गर्ह्य मानिली आहे; पण आडवें आलें म्हणजे कापून काढावयास नको काय?" [कें. टिळक.] तात्पर्य, नीतीचे सामान्य नियम कांहींहि असले, तरी त्यांतहि अपवाद असतात आणि आपल्या बोलण्यानें किंवा वर्तनानें सार्वजनिक ऊर्फ सर्वभूतहितावर होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांवरून त्यांतील विवेकाऽविवेक शोधला पाहिजे.

## शिवाजीचें ध्येय काय होतें ?

शिवाजी काय मुसलमानांचा द्वेष्टा होता? मुळींच नाहीं. तो कोणाचाच द्वेष्टा नव्हता. शिवाजीची मायभूमी गुलाम होती. त्या गुलामगिरीचा तो द्वेष्टा होता. आणि गुलामगिरीचा द्वेष करून, तिला रसातळाला नेण्याचा यत्न करणें, हा तर प्रत्येक मनुष्याचा निसर्गदत्त अधिकारच आहे. लौकिकी धर्मापेक्षां हा राष्ट्रस्वातंत्र्याचा धर्म उद्दीपित करणें, हें मोठें कौतुकास्पद कार्य होय. शिवाजीला हें महत्कार्य पार पाडावयाचें होतें. महाराष्ट्र मऱ्हाठ्यांचा. त्यावर

इस्लामी सत्ता काय म्हणून ? मऱ्हाठ्यांच्या राजकारणी स्वयंनिर्णयाचे हे इस्लामी मक्तेदार कोण ? यांची मक्तेदारी आम्हाला साफ नको. मी मऱ्हाठयांना दास्यमुक्त करीन. या उदात्त महत्वाकांक्षेनें बालवयांतच फुरफुरलेल्या शिवाजीला प्रत्यक्ष कार्य करतांना येणाऱ्या संकटांचा, अखिल महाराष्ट्राच्या भवितव्यतेच्या जबाबदारीकडे एकाग्र लक्ष ठेऊन, बनेल तसा फडशा पाडणें कर्तव्यप्राप्तच होते. त्यानें अफझुलखानाचा कोथळा फोडला, तो तो मुसलमान होता म्हणून नव्हे. अशी समजूत करून घेणें हा गाळींव गाढवपणा होय. अफझुलखानाच्या स्वारीचा उद्देश, त्यानें विजापुरास मारलेली पैज, येतांना वाटेंत केलेले अत्याचार, आणि शिवाजीविरुद्ध रचलेला व्यूह न जाणण्या इतका शिवाजी बावळट नव्हता. अफझुलखान म्हणजे महाराष्ट्राच्या उदयोन्मुख स्वातंत्र्यावर प्रस्थापित अदीलशाही सत्तेनें फेकलेला बांबगोळाच होय, ही त्या तरुण राष्ट्रवीराची बालंबाल खात्री पटल्यामुळेंच, शिवाजी आपल्या कर्तव्याची दिशा ठरवूनच, त्याच्या डावाशीं प्रतिडाव खेळला आणि अखेर अतुल्य प्रसंगावधानानें त्यानें त्याला त्याच्याच युक्तीनें गारद करून, शिवाजीचा महाराष्ट्र-स्वातंत्र्याचा उद्योग म्हणजे सहजगत्या टाचेखालीं विझणारी ठिणगी नव्हे, हें त्यानें विजापूरच्या प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिलें.

शेक्सपियरच्या हॅमलेटला गीताशास्त्राचें पाठबळ नव्हते, म्हणून त्याच्या ' जगावें कां मरावें ? ' या शंकेचें पर्यवसान दुःखपर्यवसायी झालें. हिंदुजन गीतेशीं बेइमान झाले, म्हणून आज ते साऱ्या जगाच्या पखालीचे बैल बनले आहेत. प्रत्येक राष्ट्रसंसाऱ्यापुढें 'जगावें का मरावें ?' हाच प्रश्न नेहमीं पडत आलेला आहे आणि तो सोडविण्याच्या कुशलतेनेंच त्या त्या राष्ट्राच्या उन्नति अवनतीचा इतिहास रंगविलेला आहे. आज प्रत्येक गुलाम राष्ट्रापुढें

हाच प्रश्न आहे आपल्यापुढें तोच आहे. शिवाजीपुढें तोच होता. आणि अर्जुनापुढेंहि तोच होता. अर्जुनाला सुद्धां कर्म कोणतें आणि अकर्म कोणतें, हाच मोह पडला होता. त्याचें मन साधुत्वाच्या कल्पनेनें वितळूं लागलें होतें. आणि राजकारणपटु मुत्सद्याग्रणि श्रीकृष्णानें वेळींच त्याच्या भ्रमाचें निरसन केलें नसतें, तर अर्जुनाच्या कपाळीं नामर्द षंडत्वाचा काळिमा कायमचा लागला असता. भारतीय महायुद्ध हिंदूहिंदूतलें होतें. एकाच राजघराण्यांतल्या दोन 'चुलत' तटांतलें होतें. आप्तस्वकीयांतील रक्तपाताचा प्रसंग. कौरव किंवा पांडव यांपैकीं कोणातरी एकाचा विध्वंस झाल्याशिवाय भरतखंडाच्या राष्ट्रीय भवितव्यतेचा महत्वाचा प्रश्न सुटणारा नव्हता. अर्जुनाच्या समोर सारा गोतावळा युद्धासाठीं सज्ज उभा. भीष्म द्रोणासारखे पूज्य गुरुवर्यहि सामन्याला समोर. अहिंसा परमो धर्मः! मग यांच्यावर शस्त्र चालवावें कीं नाहीं? हा सारा गोतावळा ठार मारून मी मिळवणार काय? भारत-साम्राज्य? त्यापेक्षां संन्यास काय वाईट? युद्धांतील रक्तपात व अत्याचार हें कर्म का अकर्म? असल्या लौकिकी विचारांनीं अर्जुन भांबाऊन गेला. त्याला राजकारणी दगलबाजी म्हणजे मोठें पाप वाटूं लागलें. तो साध्या संसारी माणसाप्रमाणें महायुद्धाच्या उद्देशाकडे व त्यांतल्या अत्याचारांकडे पाहूं लागला. त्यामुळें नीति न्याय धर्म सत्य यांची विकृत रूपें त्याला दिसून, कर्तव्याकर्तव्याचा त्याला विवेकच उरला नाहीं. मिथ्या साधुत्वाच्या कल्पनेनें अर्जुनाच्या पौरुषत्वाला अविवेकाची लागत असलेली वाळवी झाडण्यासाठीं श्रीकृष्णाला कितीतरी प्रयत्न करावे लागले. नीति सांगितली, विवेक पढवला, अखेर दमधाटी सुद्धां केली, तेव्हां कोठें हे सव्यसाची धनंजय युद्धाला प्रवृत्त झाले. आता शिवाजीकडे पहा. "हिंदवी स्वराज्य व्हावें हें श्रींच्या मनांत फार आहे"

# सर्व ऋतूंत अचूक गुणकारी औषधें !

# इनाम दोन हजार रुपये.

**जवानमर्द मोदक:**— बिलकूल गेले गुजरलेले नपुंसकखेरीज करून बाकी कशीहि अशक्तता असली तरी ती याचे २१ दिवसांचे सेवनानें जादूसमान दूर होते. धातु पाण्याप्रमाणें पातळ, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, इंद्रिय शिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मेंदूचे विकार, मूत्रसंकोच अथवा मूत्रातिरेक, उपदंशाचे मुरलेले विकार, शरीरदाह, विद्यार्थ्यांचे अभ्यासांत मन न लागणें, स्मरणशक्ति मंदावणें, आळस फार, उत्साह नसणें, डोके, छाती पाय, कंबर वगैरेंत पीडा, रक्त–मांसहीन शरीर वगैरे वगैरे धातुक्षीणतेपासून व कोणत्याहि आजारांतून उठल्यानंतर जी अशक्तता येते ती व तिजपपासून होणारे अनेक रोग ह्या औषधापासून पळतात. शारिरीक मानसिक श्रम करणारांस भरपूर शक्ति ठेवते. वीर्यस्तंभक व कामोत्तेजक नंबर एकचे आहे. २१ दिवस पुरणाऱ्या व पूर्ण गुण देणाऱ्या ह्या मोदकाची किंमत २॥ रुपये आहे. ह्या मोदकाचे सेवनानंतर लगेच जे आमचे प्रसिद्ध "**कामशक्ति नवजीवन**" २४ दिवस पुरणारें किंमत रुपये ३ चे सेवन करतील तर खात्रीनें पूर्ण मर्द बनतील. कामशक्ति ताब्यांत ठेवणें कठीण जातें.

आमच्या बहुतेक औषधी फार मेहनतीनें मिळविलेल्या व खानदानी चालत आलेल्या आहेत. आमच्या औषधी खोट्या आहेत, हें सिद्ध करणारांस **२००० रुपये इनाम देऊं.** पत्रव्यवहार गुप्त राखला जातो. किंमतीशिवाय पोष्ट व्ही.पी. खर्च एक ते दोनहि औषधास सहा आणे जास्त पडेल.

**मॅनेजर–नवजीवन दवाखाना, (एस) नागपूर सिटी.**

या ध्येयाच्या सिद्धीसाठीं झगडतांना शिवाजीवर अनेक प्राणघातक व ध्येयविध्वंसक प्रसंग आले. परंतु, प्रत्येक मुकाबल्याला तो आपल्या कर्तव्याचा मार्ग स्पष्ट आखूनच त्याला बेधडक स्वतः तोंड देत गेला. शाहिस्तेखानावरील मुकाबला घ्या, अफझुलखानाच्या दगेबाजीवर केलेली मात घ्या, शहाजी राजाच्या सुटकेसाठीं केलेलें कारस्थान घ्या, आग्र्याहून निसटण्याची योजना घ्या काय वाटेल तो प्रसंग घ्या, त्यांत कर्तव्याची स्पष्ट कल्पना करून निधड्या छातीनें शिवाजी त्याचा फडशा पाडीत गेला. अर्जुनाप्रमाणें शिवाजी कधीं भांबावला नाहीं. कधीं संन्यास घ्यायला उठला नाहीं.

## बगलबाज अर्जुन आणि दगलबाज शिवाजी

या तुलनेंत विचारांचें ब्रम्हांड आहे. भारतीय समर भूमीवरील अर्जून आणि प्रतापगडावर अफझुलखानापुढें उभा ठाकलेला शिवाजी, यांची तुलना केली, तर अर्जुनापेक्षां शिवाजी शतपट श्रेष्ठ ठरतो. काकामामा आप्पाबाबा यांना कसें मारूं, या क्षुद्र कल्पनेला बळी पडून, विहित कर्तव्याला बगल मारून पळूं पहाणारा बगलबाज अर्जून पहा आणि भेटीचे ढोंग करून दगा देण्यास आलेल्या दगलबाज अफझुलखानाला त्याच्याच युक्तीनें गारद करणारा कर्तव्यतत्पर सवाई दगलबाज शिवाजी पहा, म्हणजे कर्तव्याकर्तव्याचें कोडें थोडें तरी सुटेल. अफझुलखान ठार मारल्याशिवाय किंवा त्याच्या हातीं शिवाजी जिवंत किंवा मेलेला सांपडल्याशिवाय, त्या मुकाबल्याचा निर्णयच लागणारा नव्हता. अर्थात् शिवाजी मारीन किंवा मरेन असा अटीतटीचा सामना देण्याच्या तयारीनेंच प्रतापगड चढला; आणि त्याच्या अलौकिक प्रसंगावधानानें त्यानें अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली.

हिंदवी स्वराज्याच्या प्राणप्रतिष्ठेसाठीं स्वतःचा प्राण देणें अथवा अफझुलखानाचा प्राण घेणें, यापेक्षां तिसरा मार्गच शिवाजीपुढें नव्हता. अर्थात् तें कर्तव्य त्यानें मोठ्या कुशलतेनें पार पाडून, 'योगः कर्मसुकौशलम्' या गीतोक्तीप्रमाणें राजकारणी

## दगलबाजांतील योगीराज

हीं आपली कीर्ती जगजाहीर केली. श्रीकृष्णानें गीता सांगितली अर्जुनाला, पण ती प्रत्यक्ष आचरणांत आणून महाराष्ट्राचा राष्ट्रधर्म भगवद्गीतेंत आहे, हें सप्रमाण सिद्ध केलें शिवाजीनें. गीतेचे पांग पांडवांनीं फेडले नाहींत. ते शिवाजीनें फेडले. महाभारतीय इतिहासाला आपल्या बुद्धिप्रभावानें रंगवून चिरंजीव करणाऱ्या दगलबाज श्रीकृष्णाला अर्जुनापेक्षां दगलबाज शिवाजी हाच खरा शिष्य व अनुयायी लाभला, यांत मुळींच संशय नाहीं. अर्थात् "यत्र योगेश्वरः कृष्णः" हा श्लोक या पुढें—

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र शिवराय भूपति ॥
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

असाच वाचला पाहिजे. बोला—

## दगलबाज शिवाजीचा जयजयकार.

3269

— लेखक, मुद्रक, प्रकाशक —
केशव सीताराम ठाकरे, प्रबोधन मुद्रणालय,
३५५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

REFBK-0003281